# राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक २५/११/२०२२ अखेरचा खरीप व रब्बी हंगाम २०२२-२३ चा साप्ताहिक अहवाल.

- **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. हवामन थंड आहे. तापमानात घट होत आहे. थंडीच्या प्रमाणात वाढ होत आहे.

- **खरीप हंगाम २०२२-२३ :**
- **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र १४२.८८ लाख हेक्टर असून दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर १४३.१० लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) अंतिम पेरणी झाली आहे. मागील वर्षी दि.२०.०९.२०२१ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील पेरणी क्षेत्र १४२.७० लाख हे. (सरासरीशी १००%) होते.

- भात पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- बाजरी, ज्वारी, भुईमूग, सोयाबीन, मका पिके पक्वतेच्या अवस्थेत काढणीची व मळणीची कामे पुर्णत्वाकडे आहेत.
- नाचणी पिक पक्वतेच्या असून काढणीची कामे सुरु आहेत.
- तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत असून पहिल्या-दुसऱ्या वेचणीची कामे सुरु आहेत.

- **रब्बी हंगाम-२०२२-२३ :**

- **पिक परिस्थिती :**

राज्यात रब्बी पिकांचे सरासरी क्षेत्र ५४.२९ लाख हेक्टर असून दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर ३०.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (५६.४५%) पेरणी झाली आहे. मागील वर्षी दि.२२.११.२०२१ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील पेरणी क्षेत्र २२.६४ लाख हे. (सरासरीशी ४१.७० %) होते.

- रब्बी हंगामाच्या लागवडीकरीता पेरणीची कामे सुरु आहेत.
- सर्व विभागात ज्वारी, मका, हरभरा पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.
- पेरलेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

**पर्जन्यमान (२०२२)**

दि.१ जून ते २५ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस १०९२.० मि.मी. असून दि.२५ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत १२८७.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११७.९ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.२५.११.२०२१ अखेर १२९०.१ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११८.१ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ० | --- |
| ४ | ७५ ते १०० % | ५ | रायगड, रत्नागिरी, नंदुरबार, कोल्हापूर, परभणी. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २९ | ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली. |

राज्यात दि.३१ ऑक्टोंबर, २०२२ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ३ तालूक्यात ५० ते ७५ %, ४९ तालूक्यात ७५ ते १००% तर ३०३ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

### ❖ नैसर्गिक आपत्ती :

दि.२५ नोव्हेंबर, २०२२ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे ऑक्टोंबर-२०२२ मधील नैसर्गिक आपत्तीमुळे ३३ जिल्हयात २८,३१,१०९ हे. पिकांचे क्षेत्र बाधीत झाले आहे. यामध्ये शेतीपिके, फळपिके व भाजीपाला पिकांचा समावेश आहे.

### ❖ किड व रोग :

राज्यात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे या किडींचा, तूर पिकावर मर रोगाचा, हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.

किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटकनाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

## खरीप हंगाम सन-२०२२-२३ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी

(दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर)



## खरीप हंगाम सन-२०२२-२३ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर)




## रब्बी हंगाम सन-२०२२-२३ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी
(दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर)



## रब्बी हंगाम सन-२०२२-२३ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर)




## विभाग निहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकांखालील सरासरी क्षेत्र ४.१७ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ४.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) अंतिम पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात व नाचणी पिकांच्या कापणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
  - मूग, उडीद, भुईमूग पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.
- **किड व रोग : निरंक.**
- **रब्बी हंगाम : २०२२-२३**
- **पिक पेरणी** : विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ०.३२ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर ०.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (२४.९९%) पेरणी झाली आहे.
  - विभागात रब्बी हंगामाच्या पेरणीची कामे सुरु आहेत.
  - हरभरा, मका पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
  - पेरलेली पिके रोपे अवस्थेत आहेत.

### नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे. थंडीच्या प्रमाणात वाढ होत आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.०१ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर २०.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) अंतिम पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिकाची काढणी अंतिम टप्प्यात आहे.
  - नागली पिक पक्वतेच्या अवसथेत असून काढणीची कामे सुरु आहेत.

- ज्वारी, बाजरी, मका, मूग, उडीद, तीळ, भुईमूग, सोयाबीन पिकांची काढणी पुर्ण झाली आहे.
- तूर पिक शेंगा भरणे, पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिकाच्या वेचणीची कामे सुरु आहेत.
- पुर्व हंगामी ऊस लागवडीची कामे सुरु आहेत. गत वर्षाच्या ऊस पिकाची कापणी सुरु आहे.

❖ **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मका पिकावर लष्करी अळीचा, तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

❖ **पिक पेरणी :** विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ५.१२ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर १.२१ लाख हेक्टर क्षेत्रावर (२३.६१%) पेरणी झाली आहे.

- रब्बी हंगामातील ज्वारी, मका, हरभरा, गहू, सुर्यफुल पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.
- पेरलेली पिके उगवण, रोपे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.

## पुणे विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते.  हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे. थंडीच्या प्रमाणात वाढ होत आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ११.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर (११२%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात, मका, बाजरी, सोयाबीन, भुईमूग, सुर्यफुल पिकांच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- मूग, उडीद पिकांच्या काढणीची कामे पूर्ण झाली आहेत.
- तूर पिक शेंगा लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.
- कापूस पिकाच्या वेचणीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी तूर पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा व मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

❖ **पिक पेरणी :** विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ११.४९ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर ६.२६ लाख हेक्टर क्षेत्रावर (५४.४९%) पेरणी झाली आहे.

- विभागात ज्वारी, गहू, मका, हरभरा पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.
- पेरलेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

❖ **किड व रोग :**

- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## कोल्हापूर विभाग कोल्हापूर

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते.  हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.६४ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ७.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

➢ भात पिकाच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

➢ नाचणी पिक पक्वतेच्या अवस्थेत काढणीची कामे सुरु आहेत.

➢ तूर पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे.

➢ मूग, उडीद पिकांची काढणी पुर्ण झाली आहे.

➢ बाजरी, सोयाबीन, मका, ज्वारी, भुईमूग पिकांची काढणी पुर्णत्वाकडे आहे.

➢ नवीन आडसाली ऊस फुटवे फुटणे ते कांडी सुटणेच्या अवस्थेत आहे. चालु हंगामातील गळीतास जाणाऱ्या ऊसाच्या तोडणीस सुरुवात झाली आहे. पुर्वहंगामी ऊसाच्या लागवडीस सुरुवात झाली आहे.

➢ सिंचन सुविधांमुळे ऊस पिकाच्या क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे.

❖ **किड व रोग : निरंक.**

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

❖ **पिक पेरणी :** विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ४.०९ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर ३.११ लाख हेक्टर क्षेत्रावर (७५.९४%) पेरणी झाली आहे.

➢ विभागात रब्बी ज्वारी, मका, गहू पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.

➢ पेरलेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

## औरंगाबाद विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे. थंडीच्या प्रमाणात वाढ होत आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर २०.६८ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) अंतिम पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

➢ कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत असून पहिल्या-दुसऱ्या वेचणीस सुरुवात झाली आहे.

➢ मका, सोयाबीन, बाजरी, भुईमूग पिकांच्या काढणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

➢ मूग, उडीद पिके काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

➢ तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.

❖ **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी तूर पिकावर शेंग माशी, शेंगा पोखरणाऱ्या अळीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी या किडींचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**

❖ **पिक पेरणी :** विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ७.४१ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर ५.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (७०.०१%) पेरणी झाली आहे.

➢ विभागात ज्वारी, गहू, मका, हरभरा पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.

➢ पेरलेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

❖ **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## लातूर विभाग खरीप हंगाम

- ❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते.  हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे.
- ❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर २७.६२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) अंतिम पेरणी झाली आहे.
- ❖ **पिक परिस्थिती :**

➢ ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत.

➢ तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.

➢ सोयाबीन, मूग व उडीद पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

➢ कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत दुसऱ्या वेचणीची कामे सुरु आहेत.

- ❖ **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर, गुलाबी बोंड अळी, तूर पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

- ❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**
- ❖ **पिक पेरणी** : विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र १३.६४ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर १०.२१ लाख हेक्टर क्षेत्रावर (७४.८६%) पेरणी झाली आहे.

➢ विभागात रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, मका, करडई व हरभरा पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.

➢ पेरलेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- ❖ **हवामान** : अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे.
- ❖ **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.७२ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर ३१.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) अंतिम पेरणी झाली आहे.
- ❖ **पिक परिस्थिती :**

➢ ज्वारी, भुईमूग, सोयाबीन, तीळ, मका, मूग व उडीद पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

➢ तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.

➢ कापूस पिक बोंडे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत पहिल्या वेचणीस सुरुवात झाली आहे.

- ❖ **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी तूर पिकावर मर रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.

- ❖ **रब्बी हंगाम : २०२२-२३**
- ❖ **पिक पेरणी** : विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ७.२९ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर २.६९ लाख हेक्टर क्षेत्रावर (३६.८७%) पेरणी झाली आहे.

➢ विभागात रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, मका, करडई व हरभरा पिकांच्या पेरण्या सुरु आहेत.

➢ पेरलेली पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.

- ❖ **किड व रोग :**

➢ विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान :** अहवाल कालावधीत विभागात आकाश कोरडे व निरभ्र होते. हवामान थंड होते. तापमानात घट होत आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१३ लाख हेक्टर असून, दि.२१ सप्टेंबर, २०२२ अखेर १९.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) अंतिम पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिकाच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
  - कापूस पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत पहिल्या वेचणीस सुरुवात झाली आहे.
  - तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन पिकाची काढणी पुर्ण झाली आहे.
- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी तूर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा, मर रोगाचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा, मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. किडींचे नियंत्रणाकरीता मार्गदर्शन करण्यात येत आहे.
- **रब्बी हंगाम : २०२२-२३**
- **पिक पेरणी :** विभागात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ४.९३ लाख हेक्टर असून, दि.२५ नोव्हेंबर, २०२२ अखेर १.९० लाख हेक्टर क्षेत्रावर (३८.६०%) पेरणी झाली आहे.
  - विभागात रब्बी हंगामाच्या पेरणीची कामे सुरु आहेत.
  - रब्बी ज्वारी, गहू, हरभरा, मका, करडई पिके उगवण ते रोप अवस्थेत आहेत.
- **किड व रोग :**
  - विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे.

### महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०२२-२३ मधील मुख्य पिकाखालील दि.२५/११/२०२२ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागिल वर्षाची पेरणी क्षेत्र दि.२२.११.२०२१ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | १७३६२८६ | ९५०७५७ | ९८८३८४ | ५६.९३ | १०४ |
| २ | गहू | १०८५०१२ | १४३६४२ | ३६५५७४ | ३३.६९ | २५५ |
| ३ | मका | २६१५४२ | ८९५८९ | १५०५१५ | ५७.५५ | १६८ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये (बाजरी,ओट,बार्ली,इतर) | ११८१७ | २२०८ | २६६३ | २२.५४ | १२१ |
| | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३०९४६५६** | **११८६१९६** | **१५०७१३६** | **४८.७०** | **१२७** |
| ५ | हरभरा | २१५८२७० | १०४३०४७ | १४७५८९५ | ६८.३८ | १४१ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये (मूग,उडीद,मटकी,पोपटी, मसूर, इतर) | १२००९० | १८७४६ | ५५२०९ | ४५.९७ | २९५ |
| | **एकूण रब्बी कडधान्ये** | **२२७८३६०** | **१०६१७९३** | **१५३११०४** | **६७.२०** | **१४४** |
| | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५३७३०१६** | **२२४७९८९** | **३०३८२४०** | **५६.५५** | **१३५** |
| ७ | करडई | २६६७५ | १०१६९ | १८७०६ | ७०.१२ | १८४ |
| ८ | जवस | १२११५ | १४७९ | १६५९ | १३.६९ | ११२ |
| ९ | तीळ | १४६७ | ११४ | १७९ | १२.२२ | १५७ |
| १० | सुर्यफुल | ५०१५ | १९४० | १६१२ | ३२.१५ | ८३ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया (मोहरी, सरसों, भुईमूग,इतर) | १०८१३ | २२८६ | ४१६१ | ३८.४८ | १८२ |
| | **एकूण रब्बी तेलबीया** | **५६०८५** | **१५९८७** | **२६३१७** | **४६.९२** | **१६५** |
| | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५४२९१०१** | **२२६३९७६** | **३०६४५५८** | **५६.४५** | **१३५** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित